नि. फौ.ख.क्र. ७७/२०१८
(नि. ३६ )

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव– हेमंत विष्णु दामोदरे ,
वय सुमारे ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
निवासस्थान– प्लॉट नं. ३२अ, चैतन्य, दत्तछाया गृहनिर्माण संस्था, शाहुपुरी, गेंडामार्ग, सातारा.

सरतपास सहा. सरकारी वकिल श्रीमती व्ही.व्ही.राऊळ यांचेमार्फत सुरु-

दिनांक ०१/०४/२०१७ रोजी मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी येथे उपअभियंता म्हणुन दिनांक १४/०६/२०१६ पासून ते दिनांक ०७/०८/२०१७ पर्यंत कार्यरत होतो. उपविभाग सावंतवाडीचे अंतर्गत सावंतवाडी, कुडाळ, दोडामार्ग व वेंगुर्ला येथील पाणी पुरवठा योजनेची कामे येतात. सन २००४ साली कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी आरवली येथे पे ॲण्ड युज टॉयलेट या कामाला रक्कम रुपये ७,१२,६५०/– ची प्रशासकीय मंजुरी दिली होती. त्यानंतर उपविभाग सावंतवाडी कार्यालय यांनी ग्रामपंचायत आरवली यांच्याशी संपर्क साधला. ग्रामपंचायत आरवली यांनी उपविभाग सावंतवाडी कार्यालय यांना हमीपत्र दिले की श्री देव वेतोबा मंदीरचे जवळ, आरवली येथे बांधकाम करा. मार्च २००५ मध्ये सदर कामाचे टेंडर झाले. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सिंधुदुर्ग यांनी एम.एल. सावंत यांना सदर कामाचे टेंडर दिले. सदर कामामध्ये पुरुषांसाठी दोन टॉयलेटस, तीन बाथरुम व पाच युरीनल्स (मुतारी) व स्त्रीयांसाठी २ बाथरुम, ३ टॉयलेटस व दोन वॉश बेशीन अशा बांधकामाचा समावेश होता. सदर कामाचे बांधकाम हे मे २००५ मध्ये पुर्ण झाले. सन २००६ मध्ये आरवली गावची यात्रा होती त्यावेळी या सर्व बांधकामाचा वापर केला गेला. सदरचे तयार झालेले बांधकाम हे आरवली ग्रामपंचायत यांनी आपल्या ताब्यात घेतले नाही. सदर तयार झालेले बांधकाम ताब्यात घेण्याबाबत आरवली ग्रामपंचायत यांच्याशी आमचा पत्रव्यवहार झाला होता.

२. दिनांक १०/०७/२०१४ रोजी पोलीस पाटील, आरवली यांनी आमच्या कार्यालयाला लेखी तक्रार केली की सदरचे तयार झालेले बांधकाम कोणीतरी पाडले आहे. त्यावेळी कार्यरत असलेले उप अभियंता यांनी आरवली ग्रामपंचायत कार्यालय यांना कळविले की, बांधकाम पाडलेबाबत तुम्ही तक्रार करा. ग्रामपंचायत कार्यालय, आरवली यांनी त्याबाबत तक्रार केली नाही. त्यानंतर पोलीस पाटील, आरवली यांचे पत्र आमचे कार्यालयाला मिळाले. सदरचे प्रकरण लोक आयुक्त, मुंबई यांचेकडे गेले असल्याचे मला कळाले. त्यानंतर लोक आयुक्त, मुंबई

यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग सिंधुदुर्ग यांना बांधकाम पाडलेबाबत तक्रार देण्याबाबतचे आदेश दिले गेले. दिनांक १६/०३/२०१७ रोजी आमचे कार्यालयाला कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण विभाग, सिंधुदुर्ग यांनी पत्रान्वये तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे मी दिनांक ०१/०४/२०१७ रोजी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. सदरची तक्रार मी अज्ञात इसमांविरुध्द दाखल केली होती. त्यानंतर केसबाबत काय झाले याची मला माहिती नाही. मी सेवानिवृत्त झालो. आता मला माझी तक्रार दाखविण्यात आली. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावरील सही माझी आहे. तक्रारीला **निशाण ३७** देण्यात आले. त्यानंतर मला पोलीसांनी कधीही बोलावले नव्हते.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>मध्यांतराची वेळ झालेने उलटतपास दुपारचे सत्रापर्यंत तहकुब.</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

दिनांक- २५/०४/२०२२

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

<u>दुपारचे सत्रानंतर उलटतपास आरोपींतर्फे वकिल श्री. एस. एन.भणगे यांचेमार्फत सुरु -</u>

३. मयत आरोपी गणेश रेगे व न्यायालयात हजर असलेले इतर आरोपी यांनी वादग्रस्त बांधकाम तोडून सरकारचे नुकसान केले असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत आरवली गावात पे ॲण्ड युज टॉयलेटची मंजुरी मिळाली होती याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. सदर उपक्रमाला ७,१२,६५०/- रक्कम रुपयाची प्रशासकीय मंजुरी मिळाली होती याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. वर्क ऑर्डरची मला वैयक्तीक माहिती नाही.

४. तक्रार दाखल करण्यापूर्वी मी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी केली होती. पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम कोणत्या सर्वे नंबर मध्ये केले गेले होते, त्या सर्वे नंबरचे मालक कोण होते याची मी खात्री केली नव्हती. पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम कोणत्या सर्वे नंबरवर केले गेले, त्या सर्वे नंबरचे मालक कोण होते, त्यावर कुळ कोण होते याची मी कागदोपत्री चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही जमिनीवर सरकारी बांधकाम करावयाचे असल्यास सरकारला भुसंपादनाची प्रक्रिया किंवा बक्षिसपत्र करुन घ्यावे लागते. ज्या जमिनीत पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम केले गेले त्या जमिनीबाबतचे भुसंपादन पत्र किंवा बक्षिसपत्र मी पाहिले नसून त्याबाबतचे हमीपत्र मी पाहिले आहे. ज्या जमिनीवर पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम केले गेले

आहे त्या जमिनीचे मालक ग्रामपंचायत, आरवली नाही. ज्या जमिनीवर पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम केले गेले त्या जमिनीचे हमीपत्र आम्हाला कोणाकडूनही मिळाले नाही. आता मला ग्रामपंचायत आरवली यांचा मासिक सभा दिनांक २२/०२/२००५ रोजीचा ठराव क्र. ९ दाखविला. (**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.एन. भणगे यांनी सदरचा कागद साक्षीदाराला उलटतपासात दाखविला. सदरचा कागद छायांकित प्रत असल्यामुळे त्याला निशाणी देता येणार नाही**. ) त्यामध्ये कोणत्या जमिनीवर कथीत बांधकाम करावे याचा उल्लेख केलेला दिसून येत नाही. आमच्या कार्यालयाने किंवा ग्रामपंचायतीने अमुक जमिनीवर बांधकाम करा असे सांगितले नव्हते. आता मला अभिलेखावर दाखल ताबा पावती दाखविण्यात आली. (**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.एन. भणगे यांनी सदरचा कागद साक्षीदाराला उलटतपासात दाखविला. सदरचा कागद छायांकित प्रत असल्यामुळे त्याला निशाणी देता येणार नाही**.) हे म्हणणे खरे आहे की सदर ताबा पावतीमध्ये किती तारखेला कथीत बांधकामाचा ताबा घेण्यात आला हे नमुद केलेले दिसून येत नाही. त्यावर ग्रामपंचायत, आरवली यांची ताबा घेणार म्हणुन सही केलेली दिसून येत नाही. तसेच, ताबा पावती सोबत जोडलेले हस्तांतरण टिपणी मला दाखविली. (**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.एन. भणगे यांनी सदरचा कागद साक्षीदाराला उलटतपासात दाखविला. सदरचा कागद छायांकित प्रत असल्यामुळे त्याला निशाणी देता येणार नाही**.) त्यावर आमचे खात्याचे उपविभागीय अधिकारी यांची सही दिसून येते, परंतु ताब्यात घेणार यांची सही दिसून येत नाही. आता मला अभिलेखावर दाखल ग्रामपंचायती आरवली यांनी दिलेले हमीपत्र दाखविले. (**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.एन. भणगे यांनी सदरचा कागद साक्षीदाराला उलटतपासात दाखविला. सदरचा कागद छायांकित प्रत असल्यामुळे त्याला निशाणी देता येणार नाही**.) त्यावर हमीपत्र कोणत्या तारखेला केले गेले त्या तारखेचा उल्लेख दिसून येत नाही. तसेच, त्यावर उपसरपंच यांची सही दिसून येत नाही. तसेच त्यावर आमचे खात्याचे उपविभागीय अधिकारी यांचे सहीसाठी जागा असूनही तेथे सही केलेली दिसून येत नाही. सदर हमीपत्रामध्ये कोणत्या जागेमध्ये, कोणत्या सर्वे नंबरमध्ये कथीत बांधकाम करावयाचे आहे याचा उल्लेख दिसून येत नाही. आता मला अभिलेखावर दाखल दिनांक १७/०४/२००७ रोजीचे संमत्ती पत्र दाखविले. हे म्हणणे खरे आहे की सदरचे संमत्तीपत्र हे एका खाजगी व्यक्तीचे आहे. यामध्ये वादग्रस्त पे ॲण्ड युज टॉयलेट दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही टॉयलेटसाठी किंवा युरीनल्ससाठी टाकी बांधणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त बांधकामाच्या जवळ श्री देव वेतोबा यांचे देवस्थान आहे. माझे म्हणण्यानुसार सेप्टीक टँक बांधले गेले नाही. आरवली गावची यात्रा असताना पे ॲण्ड युज टॉयलेटचा वापर केला गेला हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. आता मला अभिलेखावर दाखल दिनांक १९/०७/२०११ रोजीचे आमचे कार्यालयाचे उप विभागीय अभियंता यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग कणकवली यांना दिलेले पत्र दाखविले. हे म्हणणे खरे आहे की सदर पत्रामध्ये आमच्या कार्यालयाने सेप्टीक टँक बांधण्यासाठी जागा उपलब्ध झालेली नाही असे कळविले असून सदरचे काम रद्द करण्याची शिफारस केलेली आहे. तसेच, आमच्या कार्यालयाने ग्रामपंचायत, आरवली यांना पे ॲण्ड युज टॉयलेटच्या इमारतीला कुलुप लावण्यास कळविले होते. आता मला अभिलेखावर दाखल दिनांक २२/०७/२०११ रोजीचे पत्र दाखविण्यात आले.

त्यामध्ये ग्रामपंचायत, आरवली यांनी उपविभागीय अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकारण बांधकाम विभाग, कणकवली यांना तुमच्या स्तरावर कुलुप लावण्यात यावे असे कळविले होते.

५. आता मला अभिलेखावर दाखल दिनांक २९/११/२०१३ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. त्यामध्ये आरवली गावातील ग्रामस्थांनी सरपंच ग्रामपंचायत, आरवली यांना कळविले आहे की, पे ॲण्ड युज टॉयलेट इमारतीचा वापर होत नाही तरी देवस्थान कमिटीकडून निधी उभारुन त्याची दुरुस्ती करण्यात यावी. आता मला अभिलेखावर दाखल दिनांक २९/०६/२०१६ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये आमचे कार्यालयाकडून कथीत बांधकाम जे करण्यात आलेले आहे त्या बांधकामाशी आमच्या कार्यालयाचा काही संबंध नसल्यामुळे, सदर बांधकाम पाडलेबाबतची तक्रार या कार्यालयातून करता येणार नाही असे कळविले आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर पत्रामध्ये शोष खड्ड्यासाठी जागा उपलब्ध नसल्याचे वारंवार पत्रान्वये ग्रामपंचायत, आरवली यांना कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर पत्रान्वये आमचे कार्यालयाने कळविले की कथीत बांधकाम हे ग्रामपंचायत, आरवली यांचे ताब्यात असून, ते आमचे कार्यालयाचे ताब्यात नाही. माझे म्हणण्यानुसार आमचे कार्यालयाला सदर केसबाबत तक्रार दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. माझे म्हणण्यानुसार आरवली गावचे पोलीस पाटील मधुसुदन गजानन सुतारमेस्त्री यांनी उपविभागीय अभियंता यांना मी सांगितलेल्या लोकांच्या विरुध्द तक्रार दाखल करा असे कळविले व त्यांची नावे दिली. हे म्हणणे खरे आहे की आरोपींविरुध्द सदरची केस ही आरवली गावचे पोलीस पाटील मधुसुदन सुतारमेस्त्री यांच्या तक्रारी अर्जावरुन व त्यांनी दिलेल्या नावांवरुन करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की मला वरिष्ठांचे आदेश मिळाले की पोलीस पाटील यांनी तक्रार केलेली आहे त्यामुळे तुम्ही तक्रार दाखल करा, त्यामुळे मी तक्रार दाखल केली. मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय येथे अधिकारी असल्यामुळे मला नाईलाजास्तव सदरची केस दाखल करावी लागली. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचा कर्मचारी असल्यामुळे आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

दिनांक– २५/०४/२०२२

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.